नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११५ Issue - 115 | वार - शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२६ Blow- Saturday Date 19 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव व चिन्ह गोठवले

## निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : तृणमूल काँग्रेस पक्षातील दोन्ही गटांना भारत निवडणूक आयोगानं नवं नाव आणि चिन्ह आज दिलं आहे. ममता बॅनर्जी यांच्या गटाला ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हे नाव देण्यात आलं आहे. फूटबॉल प्लेअर हे चिन्ह देण्यात आलं आहे. मात्र, ममता बॅनर्जींना मोठा धक्का बसला आहे, कारण नंदिग्रामच्या पोटनिवडणुकीतून ममता बॅनर्जींच्या गटानं दिलेल्या उमेदवारानं निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. यानंतर ममता बॅनर्जी यांनी नंदिग्राममध्ये काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचं जाहीर केलं आहे.

नंदिग्राम विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतून संचिता प्रधान (डे) यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी त्यांची भूमिका मांडली. संचिता प्रधान (डे) यांनी काल मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांची भेट घेतली होती. आम्ही नंदिग्राम पोटनिवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा देणार आहोत. इंडिया आघाडी मजबूत व्हावी म्हणून हा निर्णय घेतला आहे. हा निर्णय देशाच्या व्यापक हिताचा भाग आहे. रेजीनगरच्या जागेबाबत नंतर निर्णय घेऊ असं ममता बॅनर्जींनी म्हटलं.

पत्रकार परिषदेत ममता बॅनर्जी यांना संचिता प्रधान (डे) यांनी नंदिग्राममधून माघार घेतल्यानं काँग्रेसला पाठिंबा दिला जातोय का असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर ममता बॅनर्जी यांनी म्हटलं की असं नाही, आम्ही अगोदरच काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता, कारण त्यांच्याकडे एक चांगला उमेदवार आहे.

निवडणूक आयोगावर टीकास्त्र

ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगानं घेतलेल्या तृणमूल काँग्रेसचं चिन्ह गोठवण्याच्या निर्णयावर भूमिका मांडली. आम्ही संविधानिक पदाचा अनादर करत नाही, मात्र आम्हाला वाटतं की लोकशाहीच्या इतिहासातील काळा दिवस आहे. आज आपल्या देशात जे होतंय ते दुर्दैवी, असंविधानिक, लोकशाहीविरोधी आणि एका राजकीय पक्षाला खूश करण्यासाठी केलं जातंय. पूर्णपणे पक्षपातीपणानं बदला घेतला जातोय,असं ममता बॅनर्जी म्हणाल्या.

मी अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस सोडू शकत नाही हे त्यांना माहिती नाही. जोपर्यंत मी या जगातून जाणार नाही तोपर्यंत हा पक्ष माझ्यासोबतच असेल. हा वाईट खेळ सुरु आहे, आम्ही याचा सामना करण्यास तयार आहे. इंडिया आघाडीला आम्हाला एकत्र ठेवायचं आहे, नंदिग्राममध्ये काँग्रेस पक्षाला समर्थन देतोय ते देशहिताचं आहे, असं ममता बॅनर्जींनी म्हटलं.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या गटाला ममता अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस नाव मिळालं आहे. तर, ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाला लिफाफा हे चिन्ह मिळालं आहे.

# सप्टेंबरच्या शेवटी राज्यात पावसाचे पुनरागमन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर काही जिल्हे अद्यापही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. अशातच बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा (चरहरीरीहींीर थशरींहशी णविरींश) जोर वाढणार आहे, असे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. तर येत्या १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ते २१ सप्टेंबरला नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडेल. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे. २२ सप्टेंबरला मराठवाड्यातही पाऊस राहील.

२१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो. बळीराजाला यामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे.

परभणीत जवळपास ४० दिवसानंतर पावसाची हजेरी

परभणी जिल्ह्यात तब्बल जवळपास ४० दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पावसाने हजेरी लावली आहे. पहाटेपासून परभणी शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत संततधार पाऊस सुरू असून, दीर्घ प्रतीक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे वातावरणात मोठा बदल झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील खरीप पिक हातून गेली आहेत. काही भागात सोयाबीन, कापूस, तूर यासह विविध पिकांना पाण्याची मोठी गरज होती अशातच आज पहाटेपासून सुरू झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. संततधार पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार असून, पिकांना या पावसाचा कितपत फायदा होतो, हे आगामी काही तासांतील पावसाच्या



प्रमाणावर अवलंबून असणार आहे.मात्र सध्या तरी जवळपास ४० दिवसांनंतर पाऊस झाल्याने सर्वसामान्य परभणीकर सुखावला आहे

धाराशिव मध्ये गेल्या दीड महिन्याहून अधिक काळापासून एका एका पावसाच्या थेंबासाठी तहानलेली जमीन आणि चातकाप्रमाणे पावसाची वाट पाहणारा शेतकरी आहे. गौराईचा आगमन झालं आणि गौराईच्या पावलाने पाऊसही आला. मध्यरात्री हलक्या स्वरूपाच्या सरी जिल्ह्यामध्ये बरसल्या. जमिनीची तहान मोठी आहे पडलेला पाऊस अतिशय तुटपुंजा आहे. या पाऊस आणि ती तहान भागली जाणार नाही. मात्र पूर्णपणे पाठ फिरवलेल्या पावसाचे गौराईसह आगमन झाल्याने शेतकऱ्यांमध्ये काहीसे समाधानाचे संकेत आहेत. पुढील काळात मोठा पाऊस होऊन दुष्काळ धुवून निघावा अशी भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. मध्यरात्री हलक्या स्वरूपाच्या सरी बरसल्या. चातकाप्रमाणे शेतकरी चांगल्या पावसाची वाट पाहत आहे.

लातूर शहर आणि परिसरात दीड महिन्यांनंतर पावसाची हजेरी

लातूर शहर आणि परिसरात दीड महिन्याच्या मोठ्या खंडानंतर अखेर पावसाने हजेरी लावली. रात्री दीड वाजल्यानंतर ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी बरसत आहेत... पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, उकाड्याने हैराण झालेल्या लातूरकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मागील काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात प्रचंड उकाडा जाणवत होता. वाढत्या उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले होते. अशातच मध्यरात्रीनंतर सुरू झालेल्या पावसाने वातावरण बदलून टाकले आहे. जोरदार वारे आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू असल्याने शहरातील अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला आहे.

हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला

हिंगोली जिल्ह्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत चिंतेचं पाणी होतं. मात्र गणरायाच्या आगमनासोबतच वरुणराजानेही हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. रात्रीपासून हिंगोली जिल्ह्यात अनेक भागांत जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह बरसणाऱ्या या पावसामुळे कोमेजून गेलेल्या खरीप पिकांना जिवदान मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. गेल्या दीड महिन्यापासून पाऊस नसल्याने सर्वाधिक फटका सोयाबीन पिकाला बसला होता. अनेक ठिकाणी पिकं माना टाकत होती, तर शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला होता. अशातच रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद आणला आहे. ज्या पावसाची शेतकरी आतुरतेने वाट पाहत होता तोच पाऊस अखेर बरसला. त्यामुळे पिकांना काही प्रमाणात का होईना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे.


# ऑस्करच्या शर्यतीत भारताचा 'गोंधळ'!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. दिग्दर्शक संतोष दावखर यांचा मराठी थ्रिलर चित्रपट 'गोंधळ' हा ऑस्कर २०२७ साठी भारताचा अधिकृत चित्रपट ठरला आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने शुक्रवारी याची अधिकृत घोषणा केली. विशेष म्हणजे, बॉक्स ऑफिसवर गाजलेला हिंदी चित्रपट धुरंधर आणि यंदाचा चर्चेतील चित्रपट हनुमान अंश यांना मागे टाकत गोंधळची निवड झाली आहे.

'गोंधळ' हा ९९व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यात बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म या श्रेणीत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिग्दर्शक संतोष दावखर यांना २०२५ मध्ये झालेल्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया मध्ये सिल्व्हर पीकॉक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

भारताच्या ऑस्कर एन्ट्रीसाठी यंदा एकूण ३३ चित्रपट स्पर्धेत होते. यामध्ये १४ हिंदी, प्रत्येकी चार मराठी, तेलुगू आणि गुजराती, तीन तमिळ, तर प्रत्येकी एक मल्याळम आणि नागामीज भाषेतील चित्रपटाचा समावेश होता. याशिवाय एका मूक चित्रपटाचाही स्पर्धेत समावेश होता. या




चित्रपटांमधून अंतिम निवड करण्याची जबाबदारी परीक्षक मंडळावर होती. या ज्युरीमध्ये पी. शेषाद्री, विजय पाटकर, हुतू कनोडिया, शांती कुमार, संदीप पराशर, संजय पाटील, साबू जोसेफ, अनिल थॉमस, विवेक वासवानी, बिजोन दासगुप्ता, हसन, वासन आणि तनिष्ठा चॅटर्जी यांचा समावेश होता. गोंधळसोबतच धुरंधर, धुरंधर: द रिव्हेंज, डग डग, हक, भामरडो, १२० बहादूर, सिंग गीतम, तेरा मेरा नाता, मैं वापस आऊंगा, लाडू, ओह माय डॉग!, देऊळ बंद २, तिघी, पेड्डी, इरुमुडी, डोरोथी, बॉर्डर २, गांधी टॉक्स, बायसन: कालामाडन, शेप ऑफ मोमो, गव्हर्नर, २०२० दिल्ली, कमांडो विन लव्ह स्टोरी, इक्कीस, प्रवास, मन आतले मनातले, ऑब्सेस, एगवा, अंग आणि हनुमान अंश हे चित्रपटही ऑस्करच्या शर्यतीत होते.

**आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी परमेश्वर चरणी नतमस्तक**

**रात्री उशिरापर्यंत भक्तिमय वातावरण**

# भक्तिभावाच्या गजरात वागदरीत श्री परमेश्वर महाराजांची पालखी मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी, ता. अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथील ग्रामदैवत श्री परमेश्वर महाराजांच्या पर्वानिमित्त आयोजित पालखी उत्सवाचा दुसरा दिवस शुक्रवारी भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक थाटात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या उत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कर्नाटकासह राज्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने वागदरीत दाखल झाले होते.

शुक्रवारी दुपारी १२.१० वाजता निंबरगा येथील हुच्चेश्वर विरक्तमठाचे शिवलिंगेश्वर महास्वामी यांच्या हस्ते पालखीची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी पर्व समितीच्या वतीने महास्वामींचा यथोचित सन्मान करण्यात आला.

त्यानंतर दुपारी १ वाजता श्री परमेश्वर, मल्लिकार्जुन, बीरलिंग आणि भूताळसिद्ध यांच्या चार पालख्या मंदिरातून बाहेर पडल्या आणि मुख्य





मिरवणुकीला सुरुवात झाली.

'परमेश्वर महाराज की जय', 'हर हर महादेव', 'रक्ष रक्ष परमेश्वर' अशा जयघोषांनी संपूर्ण मंदिर परिसर आणि गावातील मुख्य रस्ते दुमदुमून गेले.

शिवभजन, हरिभजन, भारूड, महिला भजन, टिपरी, लेझीम, लमाणी नृत्य, ढोल-ताशा पथके, वेशभूषा व विविध लोकनृत्यांच्या सादरीकरणामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. सुमारे रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक पुन्हा मंदिरात दाखल झाली.

उत्सवासाठी आलेल्या भाविकांसाठी गव्हाची खीर, खिचडी-आंबील, कडक भाकरी तसेच भात-सांबार या प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

**मान्यवरांची उपस्थिती**

पालखी मिरवणुकीत अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, डीवायएसपी राजेंद्र टाकणे, पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे, सरकारी कंत्राटदार परमानंद अल्गोंड-पाटील, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवलिंगप्पा खेडगी, मल्लिकार्जुन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले. समितीच्या वतीने मान्यवरांना श्री परमेश्वर महाराजांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या आगमनावेळी बसवराज शेळके, सुनील सावंत, रविकिरण वरनाळे, प्रदीप पाटील, शिवराज मंत्री पोमाजी, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, महादेव सोनकवडे, राज यादव, शाम बाबर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**पालखीला मान्यवरांचा खांदा**

पालखी सोहळ्यात शरणप्पा खैराटे, शेखर हराकरे, महादेव भारमडे, शरण निंबाळे, शरणप्पा पुजारी, बंडेप्पा पुजारी, शिवशंकर पोमाजी, शिवलिंग वमने, महादेव पोमाजी, हणमंत आळगे आदींनी पालखीला खांदा दिला.

मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याच्या वतीने कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**समिती सदस्यांचे परिश्रम**

पालखी उत्सव यशस्वी करण्यासाठी नूतन अध्यक्ष राजकुमार निंबाळे, शरणप्पा मंगणे, श्रीमंत सलगरे, घाळय्या स्वामी, अशोक पोमाजी, सचिव शांतेश्वर कोटे, उमेश पोमाजी, महादेव पोमाजी, सातप्पा पोमाजी, परमेश्वर पोमाजी, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, परमेश्वर झळकी, शिवानंद गोगाव, विजय निंबाळे, शिवलिंग बाळीफडे, चंदू कणसे, परमेश्वर कणमुसे, शिवशरण बिराजदार आदींनी परिश्रम घेतले.

### श्री परमेश्वर महाराजांच्या चरणी नतमस्तक!

**अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथे श्री परमेश्वर आराधना (पर्व) पालखी मिरवणूक महोत्सवानिमित्त उपस्थित राहून श्री परमेश्वर महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. भक्तिभावाने पार पडणाऱ्या या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन उपस्थित भाविकांशी संवाद साधला. या पवित्र सोहळ्याच्या निमित्ताने वागदरीसह अक्कलकोट तालुक्यातील सर्वांच्या सुख, समाधान, उत्तम आरोग्य आणि समृद्धीसाठी महाराजांच्या चरणी मनोभावे प्रार्थना केली.**

**– आ. सचिन दादा कल्याणशेट्टी**

# तथागतांचा बौद्ध धम्म म्हणजे मानवी जीवन विकसनशील जगण्याचा मध्यम मार्ग

## राजश्रीताई कदम; मौजे होर्टी येथे भारतीय बौद्ध महासभेच्या ग्रामशाखेचे उद्‌घाटन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : तुळजापूर तालुक्यातील मौजे होर्टी येथे भारतीय बौद्ध महासभेच्या ग्राम शाखेचे उद्घाटन नुकतेच उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून बोलताना भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव दक्षिण विभाग जिल्हाध्यक्षा राजश्रीताई कदम यांनी तथागत भगवान गौतम बुद्धांच्या धम्माची मूलतत्त्वे आणि मानवी जीवनातील त्यांचे महत्त्व स्पष्ट केले.



तथागतांचा बौद्ध धम्म हा प्रज्ञा, शील आणि करुणा या तीन मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. प्रज्ञा म्हणजे विद्या, ज्ञान आणि विवेक; शील म्हणजे सदाचार व योग्य आचरण, तर करुणा म्हणजे सर्व प्राणी मात्रां वर दया, प्रेम आणि आपुलकीची भावना होय. या तत्त्वांच्या आचरणातून मानवी जीवनाचा विकास होतो, असे राजश्रीताई कदम यांनी सांगितले.

तथागतांचा धम्म हा धर्मापेक्षा वेगळा असून, तो मानवाला नैतिक मूल्ये, समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा मार्ग दाखवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी बौद्ध धम्माचा स्वीकार करून लाखो अनुयायांना या धम्माची दीक्षा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा जपत प्रत्येकाने धम्माचे आचरण केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे तुळजापूर तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे होते. ग्रामशाखेचे संस्कार उपाध्यक्ष संजय थोरे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले.

यावेळी जिल्हा संस्कार उपाध्यक्ष बाळासाहेब बागडे, संरक्षण उपाध्यक्ष कांचन चिमणे, तालुका पर्यटन उपाध्यक्ष चिमणे, मेजर शरद बागडे, मेजर सिरसट, मेजर बागडे, सैनिक कांबळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

ग्रामशाखेची कार्यकारिणी जाहीर होर्टी यावेळी ग्राम शाखेच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. अध्यक्षपदी गणेश गायकवाड, सर चिटणीसपदी तन्मा गायकवाड, कोषाध्यक्षपदी अनिल गायकवाड .संस्कार उपाध्यक्षपदी संजय थोरे, संरक्षण उपाध्यक्षपदी संजय वाघमारे, पर्यटन उपाध्यक्षपदी परमेश्वर वाघमारे आणि महिला उपाध्यक्षपदी प्रतिभा वाघमारे यांची निवड करण्यात आली.

संस्कार सचिवपदी अंकुश गायकवाड, महिला सचिवपदी शिला–ताई गायकवाड, संरक्षण सचिवपदी प्रकाश गायकवाड, पर्यटन सचिवपदी लक्ष्मण भालशंकर यांची नियुक्ती करण्यात आली. संघटक म्हणून विलास गायकवाड, विनोद गायकवाड, पल्लवी मस्के आणि अर्चनाताई गायकवाड यांची कार्यकारिणीत निवड करण्यात आली.

नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे यावेळी स्वागत व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अंगद गायकवाड, झुंबर दगडू मस्के, सिद्राम हरिश्चंद्र वाघमारे, तुकाराम भालशंकर, दत्ता हिरवे, धर्मा हरिश्चंद्र वाघमारे, बाबासाहेब गायकवाड, एकनाथ वाघमारे, कविता धुळाप्पा वाघमारे, द्रौपदीबाई राम गायकवाड, सुगलाबाई रोहिदास थोरे, शांताबाई सुभाष वाघमारे, सीताबाई राम भालशंकर, रेखाबाई अंगद गायकवाड, सुनंदाबाई विलास गायकवाड, इंदूबाई लक्ष्मण भालशंकर यांच्यासह अनेक नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले, तर शाखाध्यक्ष गणेश गायकवाड यांनी आभार मानले.

## संपादकीय....

### पावसाची तूट

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर काही जिल्हे अद्यापही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. अशातच बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार असल्याचे हवामान शास्त्रज्ञांनी अंदाज व्यक्त केला असला तरी प्रत्यक्षात पाऊस पडल्यावरच बळीराजाला दिलासा मिळेल. कारण यंदा एल निनोचा प्रभाव जाणवत असून येत्या काही दिवसात याचे पडसाद उमटणार आहेत. दरम्यान येत्या १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ते २१ सप्टेंबरला नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडेल. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे. २२ सप्टेंबरला मराठवाड्यातही पाऊस राहील. २१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो. बळीराजाला यामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे. परभणी जिल्ह्यात तब्बल जवळपास ४० दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पावसाने हजेरी लावली आहे. पहाटेपासून परभणी शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत संततधार पाऊस सुरू असून, दीर्घ प्रतीक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे वातावरणात मोठा बदल झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील खरीप पिक हातून गेली आहेत. काही भागात सोयाबीन, कापूस, तूर यासह विविध पिकांना पाण्याची मोठी गरज होती अशातच आज पहाटेपासून सुरू झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

# नळदुर्ग व परिसरात गौरी लक्ष्मीचे घरोघरी उत्साहात स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : गणपती बाप्पा मोरया ! मंगलमूर्ती मोरया! असा गजरामध्ये नळदुर्ग व परिसरामध्ये विघ्नहर्ता गणरायाचे आगमन झाले. त्या पठोपाठ दि.१८सप्टेंबर रोजी गौरी लक्ष्मीचे तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग, वागदरी, गुजनूर शहापूर दहिटणा व परिसरात भक्तिमय वातावरणात गौरी लक्ष्मीचे घरोघरी स्वागत करण्यात आले.

गौरी लक्ष्मीच्या स्वागता पूर्वी घरादाराची स्वच्छता करण्यात येते. विशेषतःमहिलांची लक्ष्मीच्या स्वागतासाठी मोठी लगबग सुरू असते स्टेजची मांडणी करणे,लक्ष्मीचे मुखवटे बसवणे, सुंदर साडी नेसून दाग दागिन्याने मडवणे व स्टेज वरती अनेक प्रकारच्या आकर्षक शोभेच्या वस्तू ठेवणे, विविध प्रकारचे गोड पदार्थ गौरी लक्ष्मी पुढे ठेवण्यात महिलांचा मोठा हातखंड असतो.

महिला कडून आपापल्या परीने लक्ष्मीची सजावट केली जाते आकर्षक लायटिंग अनेक देखाव्याच्या वस्तू लाडू बुंदी सह पुरणपोळी शेंगदाण्याची पोळी वगैरे पदार्थ या निमित्ताने केले जातात.काही जवळच्या लोकांना भोजनदान दिले जाते. सासरवासातून आपल्या मुली माहेरी आल्यनंतर जो आनंद मिळतो तोच आनंद या निमित्ताने मिळतो.मुलीचे प्रतिक म्हणून गौरी लक्ष्मी कडे पाहीले जात.

माहेरात उत्साही वातावरणात स्वागत करून गौरी लक्ष्मीला प्रसन्न करण्यात महिलावर्ग मग्न असतात सकाळपासूनच ज्यांच्या घरी लक्ष्मी बसलेली आहे त्यांच्या घरी लक्ष्मी पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी गावातील महिला पुरुष लहान मुलांची वर्दळ असते. प्रत्येकाच्या घरी जाऊन लक्ष्मी चे मनोभावे दर्शन घेतात.महिला एकमेकींना कुंकू हळद लावतात. या निमित्ताने दिवसभर गावात आनंदी व उत्साही वातावरण पाहावयास मिळते. दुसऱ्या दिवशी गावातील सुवासिनी महिलांच्या हस्ते गाठी घेऊन गौरी लक्ष्मीला निरोप दिला जातो हिंदू धर्मात हा सन अत्यंत महत्त्वाचा व आनंदाचा मानला जातो.

# शिवदास रिंढे यांची बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदी फेरनिवड

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील मोहाडी या छोट्याशा गावातून आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात करणारे खंबीर व निष्ठावंत नेतृत्व शिवदास रिंढे यांची बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदी फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या उत्कृष्ट संघटन कौशल्याची आणि सातत्यपूर्ण पक्षकार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे दुसऱ्यांदा सोपवण्यात आली आहे.



**मोहाडी ते जिल्ह्यापर्यंतचा यशस्वी प्रवास**

शिवदास रिंढे यांचा सामाजिक व राजकीय प्रवास तळागाळातील लोकांशी जोडलेला आहे. मोहाडी गावचे सरपंच म्हणून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. गावात राबवलेले लोकोपयोगी उपक्रम आणि पक्षसंघटन मजबूत करण्याचे काम यामुळे त्यांनी अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

यानंतर त्यांनी सिंदखेडराजा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून पक्षवाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. केवळ राजकीयच नव्हे, तर सहकार क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला असून सिंदखेडराजा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे.

> **पक्षाने माझ्यावर पुन्हा एकदा दाखवलेला हा विश्वास माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. प्रदेश नेतृत्व आणि जिल्हा नेतृत्वाचे आभार मानून बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अधिक तळागाळापर्यंत पोहोचवणे, संघटना बळकट करणे आणि सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणे हेच माझे मुख्य ध्येय असेल.**
>
> – **शिवदास रिंढे,** जिल्हा सरचिटणीस, बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटी

**वरिष्ठ नेतृत्वाकडून कार्याची पावती**

शिवदास रिंढे यांच्या पक्षनिष्ठा व कार्यक्षमतेची दखल घेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या मान्यतेने व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. रिंढे यांच्या फेरनिवडीमुळे सिंदखेडराजा तालुका आणि बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# निफाड नगरपंचायत च्या वतीने सेवा संकल्प अभियान; विविध शासकीय सेवा नागरिकांच्या दारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा, तसेच प्रशासन आणि नागरिकांमधील समन्वय अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने निफाड नगरपंचायतीमार्फत 'सेवा संकल्प अभियान'. दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवा, प्रमाणपत्रे व योजनांची माहिती तसेच आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांच्या अडचणी व प्रलंबित कामांचा आढावा घेऊन संबंधित विभागामार्फत त्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

या अभियानांतर्गत जन्म–मृत्यू प्रमाणपत्रे, विविध दाखले, मालमत्ता कर आकारणी, नवीन मालमत्ता नोंदणी, नवीन नळ कनेक्शन देणे, स्वच्छता तक्रारींचे निराकरण, बांधकाम परवानगी, 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर', वृक्षारोपण अभियान, स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, मालमत्ता हस्तांतरण नोंदी घेणे, विविध शासकीय योजना तसेच नगरपंचायतीशी संबंधित नागरिक सेवांबाबत आवश्यक मार्गदर्शन व सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांना कार्यालयीन कामकाजासाठी अनावश्यक फेऱ्या माराव्या लागू नयेत, सेवा अधिक पारदर्शक व गतिमान व्हाव्यात आणि पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा, यासाठी निफाड नगरपंचायतीकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**सेवा संकल्प अभियानांतर्गत डोहोळे ग्रामपंचायत व खडवली मातोश्री वृद्धाश्रमात विशेष उपक्रम**

# सेवा संकल्प व स्वच्छता ही सेवा व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पंचायत समिती भिवंडी अंतर्गत येणाऱ्या ग्रुप ग्राम पंचायत डोहोळे येथे 'सेवा संकल्प अभियान', 'स्वच्छता ही सेवा अभियान' तसेच 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा' शुभारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत एल. पुलकुंडवार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव (भा.प्र.से.) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप, मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट तसेच 'आशीर्वादाचा दिवा' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ग्रामपंचायत स्तरावर उल्लेखनीय काम केल्याबद्दल ग्रुप ग्रामपंचायत डोहोळेचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांचा ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत एल. पुलकुंडवार यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान, सेवा संकल्प अभियानांतर्गत खडवली येथील मातोश्री वृद्धाश्रमास भेट देऊन अभियानाचा विशेष उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या, गरजा जाणून घेतल्या तसेच विविध शासकीय योजनांची माहिती दिली यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी सेवा संकल्प



अभियानाच्या माध्यमातून वृद्धाश्रमास भेट देण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. वृद्ध नागरिकांना भेटून त्यांच्याशी संवाद साधणे हा या अभियानातील संवेदनशील आणि महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध प्रशासकीय योजना व नागरिकाभिमुख सेवांबाबत जनजागृती करून ज्येष्ठ नागरिकांना पात्रतेनुसार शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. वृद्ध नागरिकांनी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, तसेच आवश्यक सेवांसाठी प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. समाज कल्याण विभागाच्या प्रमुख उज्ज्वला सपकाळे यांनी यावेळी वृद्धाश्रमातील उपस्थितांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. वृद्धाश्रम ही आजच्या काळातील एक महत्त्वाची गरज बनत असल्याचे नमूद करताना, मातोश्री वृद्धाश्रमात आल्यानंतर येथे कुटुंबातील सदस्यांसारखे आपुलकीचे वातावरण जाणवत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत, पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.सेवा संकल्प अभियानांतर्गत मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवातून आणि आशीर्वादातून समाजाला प्रेरणा मिळते, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि प्रशासनाची सेवा यांचा संगम घडवत, त्यांच्या जीवनात आपुलकी, सन्मान आणि सुरक्षिततेचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासकीय योजना व सेवा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच ज्येष्ठ नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या गरजा समजून घेण्यावर भर देण्यात येत आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, भिवंडी गटविकास अधिकारी गोविंद खामकर, विस्तार अधिकारी सुधाकर सोनवणे, बाल विकास प्रकल्प अधिकारी रोहित जाधव, ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे तसेच मातोश्री वृद्धाश्रमातील अधिकारी–कर्मचारी आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी–कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अभिलेख कक्षाचे अखेर स्थलांतर होणार!

## देवेंद्र काजळे यांच्या उपोषणाची प्रशासनाकडून दखल; दोन महिन्यांत स्थलांतराचे लेखी आश्वासन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तहसील कार्यालयातील अभिलेख कक्ष नव्या तहसील कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरित करण्याच्या मागणीसाठी कारसूळ येथील सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र काजळे यांनी शुक्रवारी (ता. १८) तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते उपोषणाची प्रशासनाने तातडीने दखल घेत येत्या दोन महिन्यांत अभिलेख कक्षाचे स्थलांतर करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. असून तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

निफाड शहरात छत्रपती संभाजीनगर- नाशिक मार्गालगत सुमारे साडेचार वर्षांपूर्वी नवीन तहसील कार्यालयाची प्रशस्त इमारत उभारण्यात आली. त्यानंतर तहसील कार्यालयाचे बहुतांश प्रशासकीय कामकाज नव्या इमारतीतून सुरू झाले. मात्र, महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज, जुने अभिलेख व कागदपत्रे असलेला अभिलेख कक्ष अद्याप जुन्या तहसील कार्यालयासमोरील एका खोलीतच सुरू आहे. त्यामुळे अभिलेख काढण्यासाठी किंवा संबंधित कागदपत्रांची माहिती घेण्यासाठी नागरिकांना जुन्या ठिकाणी जावे लागत होते. नवीन तहसील कार्यालय आणि अभिलेख कक्ष यांच्यातील अंतरामुळे नागरिकांची विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचा मुद्दा काजळे यांनी उपस्थित केला. तहसील कार्यालयाचे सर्व कामकाज एकाच ठिकाणी उपलब्ध असताना अभिलेख कक्ष मात्र जुन्याच ठिकाणी सुरू असल्याने नागरिकांना हेलपाटे मारावे लागत असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

अभिलेख कक्ष नव्या तहसील कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरित करावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. मात्र, या मागणीवर ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर काजळे यांनी बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला. शुक्रवारी सकाळपासून त्यांनी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.

या उपोषणाची माजी आमदार अनिल कदम यांनी दखल घेतली असून

उपोषणाची माहिती मिळताच तहसील प्रशासनाने काजळे यांच्याशी चर्चा केली. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन अभिलेख कक्ष स्थलांतरित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. याबाबत तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी काजळे यांना लेखी आश्वासन दिले. तर, निफाडचे माजी आमदार अनिल कदम यांनी देखील तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्याशी चर्चा करीत अभिलेख कक्ष तातडीने स्थलांतरित करण्यास सांगितले.

लेखी आश्वासनात येत्या दोन महिन्यांच्या कालावधीत अभिलेख कक्ष नव्या तहसील कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर काजळे यांनी आपले उपोषण मागे घेतले. तहसीलदार नाईकवाडे यांच्या हस्ते त्यांना उपोषण सोडविण्यात आले.

# कळंब तहसीलवर छावा संघटनेचा शेतकरी आसूड आणि रुमण मोर्चा धडकला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) : कोरडा दुष्काळ जाहीर करणे, हेक्टरी एक लाख रुपये मदत, कर्जमाफी यासह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी कळंब तहसील कार्यालयावर हलगी वाजवत शेतकरी आसूड व रुमण मोर्चा काढला.



या मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपतींना अभिवादन करून दुपारी १ वाजता मोर्चाला सुरुवात झाली. या वेळी शेतकऱ्यांनी वाळलेली सोयाबीनची पिके हातात घेऊन आणि हलगीच्या निनादात घोषणाबाजी करत मोर्चा काढला. हा मोर्चा महात्मा फुले चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, अहिल्याबाई होळकर चौकातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून मोर्चा तहसील कचेरीवर धडकला.

या मोर्चाचे नेतृत्व प्रदेश कार्याध्यक्ष मच्छिंद्र चिंचोले यांनी संघटना प्रमुख नानासाहेब जावळे पाटील यांच्या आदेशाने केले. या मोर्चा मध्ये खालील मागण्या करण्यात आल्या.

या मध्ये जिल्ह्यात कोरडा दुष्काळ तात्काळ जाहीर करावा, पंचनाम्याशिवाय सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी, जनावरांसाठी पाणी व चारा छावण्या तात्काळ सुरू कराव्यात, मराठवाड्यासाठी आण्णासाहेब जावळे पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्वतंत्र स्थापना करावी, मराठा आरक्षणावर तात्काळ निर्णय घ्यावा, शेतकरी कर्जमाफीची तात्काळ अंमलबजावणी करावी आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. या मोर्चातील मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी मा.गणेश शिंदे यांना देण्यात आले. या मोर्चा साठी मराठवाडा अध्यक्ष बाळासाहेब भोसले, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, अमर शेख, भागवतराव खांडपुरे, हरिभाऊ काळे, रामप्रसाद पुरी, रहेमान पटेल, सुजितकुमार मुळे यांच्यासह कळंब तालुकाध्यक्ष अमर गायकवाड, सचिन पठाडे, आकाश जेधे, मंगेश सुकाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते. या मोर्चाचे सूत्रसंचालन व आभार जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके यांनी मानले.

# मोहा येथे विविध ठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्रामदिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रविण म.कसबे / मोहा प्रतिनिधी . कळंब तालुक्यातील मोहा येथे ग्रामपंचायतीत १७सप्टें. २०२६रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण मोहा ग्राम पंचायत च्या सरपंच सौ.सिमा संदीप मडके यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर मडके व महेश नागटिळक यांच्या हस्ते करण्यात आले.व तिरंगा झेंड्याचे ध्वजारोहण शाळेच्या मुख्याध्यापिका भिंगारे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.




याप्रसंगी शाळेचे शिक्षक डिकले सर यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाचे माहिती व महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी सरपंच सौ. सिमा संदीप मडके, मा. जिल्हा परिषद सदस्य संदीप मडके , उपसरपंच बशारत मोमीन, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी संचालक प्रविण कसबे, राहुल कसबे, समाधान कसबे, पांडुरंग मडके, ग्रामपंचायत सदस्य अनिल मडके, बालाजी मडके सर्व शिक्षिकवृंद, विद्यार्थी, तसेच शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टिस्टेटचे कर्मचारी, आशा कार्यकर्त्या व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तसेच उर्दू शाळा मोहा येथे स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच बशारत मोमीन व उर्दू शाळेच्या शिक्षिका यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले.

शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टिस्टेट येथे शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टिस्टेटचे हनुमंत तात्या मडके यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून तिरंगा झेंड्याचे ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी सरपंच सौ.सिमा मडके, मा.जिल्हा परिषद सदस्य संदीप मडके व मोहेकर मल्टिस्टेटचे कर्मचारी वृंद तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते.



# मराठी माध्यमांच्या शाळा टिकवण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधी व पालकांची आहे : महेश कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड): शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही इंग्लिश मीडियम स्कूलचे आकर्षण पालकांमध्ये निर्माण झाले असून त्याचा परिणाम शासना मार्फत व शिक्षण संस्था मार्फत चालविल्या जाणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी पट संख्येवर होऊन मराठी माध्यमाचा शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून मराठी माध्यमांच्या शाळा टिकवण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी पालक आणि शिक्षक यांचीच आहे.असे प्रतिपादन पार्वती कन्या प्रशाला जळकोट चे अधक्ष महेश बंकरराव कदम यानी येथे बोलताना केले.

. पार्वती कन्या प्रशाला जळकोट ता.तुळजापूर येथे शिवजी तरुण मंडळ जळकोट व पार्वती कन्या प्रशाला च्या वतीने ७८व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी तरुण मंडळाचे अध्यक्ष तथा पार्वती कन्या प्रशाला जळकोटचे अध्यक्ष महेश बंकटराव कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक भाऊ पाटील संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर,कृष्णात आण्णा मोरे तालुका उपप्रमुख शिवसेना उबाठा,यशवंतराव कदम पाटील अध्यक्ष महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिति,राजकुमार पाटील चेअरमन विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटी, दत्तात्रय शिंदे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, आदी उपस्थित होते.

. या प्रसंगी अध्यक्षिय स्थानावरून महेश कदम बोलत होतो.पुढे बोलताना ते म्हणाले की इंग्लिश मेडियम शाळांच्या आकर्षणामुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या झपाट्याने घटत असून पट संख्येच्या कारणावरून मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत तरी या शाळा बंद पडू नये यासाठी समाजातल्या सर्व स्तरातून प्रयत्न होणे काळाची गरज आहे.

. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल,थोर स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमांचे पूजन करून आभिवादन करण्यात आले.

. ,जिल्हा परिषद सदस्या प्रतिक्षा गोपाळ सुरवसे,पंचायत समितीच्या उपसभापती रोहीणी विवेकानंद मिलगिरी, पंचायत समिती सदस्य ड अशिष सोनटक्के पंचायत समिती सदस्य भिवाजी इंगोले, पंचायत समिती सदस्य सुवर्णा गुंजिटे, सरपंच गजेंद्र पाटील, अँड.सचिन कदम, प्रा.डॉ.रामकृष्ण कदम, प्रा.डॉ.अंकुश कदम,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिमाशंकर हासुरे,पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय सचिव संपर्कप्रमुख अरुण लोखंडे,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्य स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या सुरेखा बालाजी माळी, ज्योती लक्ष्मीकांत पाटिल, गुनवंत विद्यार्थी

सारंग बालाजी माळी,शौर्य करबसाप्पा धमुरे, आरोही राम सातपुते आदींचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या वेळी यावेळी मुख्याध्यापिका लता सोमवंशी सहशिक्षक अभिमन्यू कदम पंडित कदम, विशाल कदम, बसवराज मडोळे, सहशिक्षिका सुजाता व्हटकर, रोहीणी तळेकर, सातपुते मॅडम, संस्थेचे सचिव ब्रम्हानंद कदम, संचालिका दिपा कदम, मुर्टा गावाच्या सरपंच सौ लोहार मॅडम,सह विद्यार्थी पालक, ग्रामस्थ व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहशिक्षक सचिन कुमार गुड्ड यांनी केले तर आभार प्रदर्शन विजयकुमार मोरे सर यांनी केले.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १९१ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

# जागृतीची ज्वाला कायम ठेवण्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा निरंतर प्रचार आवश्य : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : समाजातील जागृतीची ज्वाला कायम प्रज्वलित ठेवण्यासाठी आदर्श महापुरुषांच्या विचारांचा निरंतर प्रचार-प्रसार झाला पाहिजे, असे प्रतिपादन फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी केले.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, पाली भाषा गौरव दिन, पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर व अनागारिक धम्मपाल जयंती तसेच बौद्धाचार्यांचे जनक भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर, अनागारिक धम्मपाल व भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर यांच्या विवेकवादाची आवश्यकता' या विषयावर १७ सप्टेंबर २०२६ रोजी साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात १९१ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मेश्राम म्हणाले, मराठवाडा मुक्ती संग्राम, पाली भाषा गौरव दिन, पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर व अनागारिक धम्मपाल जयंती आणि भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर स्मृतिदिन या पाचही संदर्भांचे सामाजिक व वैचारिक महत्त्व लक्षात घेऊन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक सुरू करून पुढे बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत या माध्यमांतून चळवळीचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविले. त्याच धर्तीवर पेरियारांनी कुडी अरासूसह रिव्होल्ट, पुरात्वी, विदुथलाई आणि उन्माई यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून आत्मसन्मान, विवेकवाद आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराच्या मुक्तीच्या प्रश्नासोबतच गावोगावी व वसाहतीतील विहारांमध्ये बुद्धत्वाचे संगोपन करण्याची आवश्यकता आहे. पेरियार, अनागारिक धम्मपाल आणि भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या वैज्ञानिक व विवेकवादी विचारांची सामाजिक जीवनात अंमलबजावणी केल्यास व्यापक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया बळकट होऊ शकते. भैय्यासाहेब आंबेडकरांनी बौद्धाचार्यांची संकल्पना पुढे आणून समाजाला प्रशिक्षित करण्यावर भर दिला होता, असेही मेश्राम यांनी सांगितले.

उद्घाटनपर भाषणात सामाजिक कार्यकर्ते डॉ. रमेशचंद्र धनेगावकर यांनी पेरियारांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा आढावा घेतला. दक्षिण भारतातील बहुजन समाजातील महिलांवर लादण्यात आलेल्या अमानवीय प्रथांचा संदर्भ देत त्यांनी पेरियारांनी पाखंडवाद व अविवेकाला केलेल्या विरोधाची माहिती दिली. अनागारिक धम्मपाल यांनीही अंधानुकरण व डोळसपणे विचार न करता पूजा करण्याच्या प्रवृत्तीला विरोध केल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते सामाजिक कार्यकर्ते सुनील पुंडकर यांनी पाली भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर अनागारिक धम्मपाल यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. पाली भाषेच्या ऐतिहासिक महत्त्वासोबतच त्रिपिटक आणि बुद्ध आणि त्यांचा धम्म यांचे व्यापक वाचन झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाची पायाभरणी धम्मपाल यांनी केली. धर्मानंद कोसंबी यांच्या पाली विषयातील योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला. पेरियारांचे सच्ची रामायण आणि स्त्रीमुक्तीविषयक कार्य समजून घेण्याची गरज असून, दीक्षाभूमी व चैत्यभूमीचे महत्त्व जनमानसात रुजविण्यात भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकरांचे योगदान महत्त्वाचे आहे. वर्तमान काळात युवककेंद्रित सामाजिक व वैचारिक कार्याला प्राधान्य दिले पाहिजे, असे पुंडकर यांनी सांगितले.

यावेळी राजेंद्र वानखेडे यांनी समाजाच्या प्रगतीसाठी संघटित प्रयत्नांची गरज व्यक्त केली. अ‍ॅड. सुनीलकुमार नागवंश यांनी, बाबासाहेबांच्या काळात माणसे आर्थिकदृष्ट्या गरीब होती; मात्र चळवळ वैचारिकदृष्ट्या समृद्ध होती. आज परिस्थिती उलट होत असल्याचे दिसते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आदर्श महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार अ‍ॅड. सुनीलकुमार नागवंश यांनी मानले.

# निफाडच्या विद्यार्थ्यांची विमानातून प्रवास करून इस्रोपर्यंत भरारी!

## तालुक्याच्या ठिकाणाहून अंतराळाच्या विश्वाला गवसणी घालण्याचा अनोखा प्रयत्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्याच्या ठिकाणी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकाशाची मर्यादा नसते फक्त त्या स्वप्नांना योग्य दिशा आणि संधी देण्याची गरज असते. याच विचारातून निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन संचलित श्रीराम क्लासेस, निफाड यांच्या 'घे भरारी' या उपक्रमांतर्गत निफाडमधील १५ विद्यार्थ्यांची इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात आली होती.

या विद्यार्थ्यांनी पुणे विमानतळ ते कोचिन विमानतळ असा विमानाने प्रवास करत आपल्या आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव घेतला. अनेक विद्यार्थ्यांसाठी विमान प्रवास हीच पहिली मोठी अनुभूती होती; मात्र या प्रवासाचा खरा उद्देश होता–विज्ञानाच्या जगाशी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष ओळख करून देणे.

या संपूर्ण शैक्षणिक प्रवासात विद्यार्थ्यांना बी. जी. गव्हाणे तसेच निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन चे संस्थापक प्रा.उल्हास पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना प्रत्येक ठिकाणी आवश्यक माहिती समजून घेता यावी, प्रवास शिस्तबद्ध आणि ज्ञानवर्धक व्हावा, यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

विद्यार्थ्यांनी केरळमधील तिरुवनंतपुरम येथील थुंबा येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरला (तडडउ) भेट दिली. भारताच्या अंतराळ संशोधनाच्या प्रवासात थुंबाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून. भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. विक्रम साराभाई यांच्या दूरदृष्टीतून भारताच्या अंतराळ संशोधनाला दिशा मिळाली आहे

इस्रोच्या या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना रॉकेट, उपग्रह, अंतराळ संशोधन आणि भारताच्या अवकाश क्षेत्रातील प्रगती याविषयी प्रत्यक्ष माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली. पुस्तकांमध्ये वाचलेले विज्ञान जेव्हा डोळ्यांसमोर प्रत्यक्ष अनुभवायला मिळते, तेव्हा शिक्षण केवळ अभ्यास राहत नाही ती एक प्रेरणादायी अनुभव बनते.

यानंतर विद्यार्थ्यांनी भारताच्या दक्षिण टोकावरील कन्याकुमारीला भेट दिली. तीन समुद्रांचा संगम, स्वामी विवेकानंद स्मारक आणि भारतीय सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाची अनुभूती देणारे हे ठिकाण विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचा आणखी एक वेगळा अध्याय ठरले.

एका बाजूला अंतराळाच्या अथांग विश्वाची ओळख आणि दुसऱ्या बाजूला भारताच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक वैभवाची अनुभूतीविद्यार्थ्यांना घेता आली 'घे भरारी' हा केवळ एक शैक्षणिक सहलीचा उपक्रम नाही; तर ग्रामीण आणि तालुक्याच्या ठिकाणी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न असल्याचे पाटील यांनी सांगितल

या उपक्रमाला निफाडमधील पालकांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी केलेले सहकार्यही तितकेच मोलाचे आहे. पालकांचा विश्वास, शिक्षकांची दिशा, मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द–यातूनच उद्याचा भारत घडणार आहे.

> **विज्ञान केवळ पुस्तकातून शिकायचे नाही, तर ते प्रत्यक्ष अनुभवायचे, प्रश्न विचारायचे आणि मोठी स्वप्ने पाहायची. 'घे भरारी' उपक्रमातून निफाडच्या विद्यार्थ्यांना इस्रोपर्यंत घेऊन जाण्याचा हा छोटासा प्रयत्न त्यांच्या आयुष्यातील मोठ्या स्वप्नांची प्रेरणादायी सुरुवात ठरावी. हीच मुले उद्याच्या भारताचे भविष्य घडवतील आणि देशाच्या प्रगतीला नवी दिशा देतील, हा आम्हाला विश्वास आहे.**
>
> **– संस्थापक : प्रा. उल्हास पाटील**
> **संचालिका : प्रा. सौ. सविता पाटील**

---

# कवळी येथे स्वामी शिवप्रेमानंदजी महाराजांचा जल्लोषात सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील कवळी हरेगाव व जवळगा वाडी येथे गेल्या ३५ वर्षांपूर्वी रामकृष्ण मिशन संस्थेच्या माध्यमातून गाव पुनर्वसन करत लोकांना पक्के घरे दिल्याने. व तत्कालीन रामकृष्ण मिशन संस्थेचे अभियंता शिवप्रेमानंदजी महाराजांनी बांधकामात कुठलिही कमतरता ना ठेवत लोकांना पुनर्वसन घरे देण्यात मोलाचं योगदान दिलं होतं. त्यामुळे कवळी गावच्या वतीने त्यांचा येथोचित सत्कार ठेवण्यात आला होता..

औसा तालुक्यातील कवळी येथे रामकृष्ण मिशन, जलपाईगुडी (पश्चिम बंगाल) येथील स्वामी शिवप्रेमानंदजी महाराज यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.होते

यावेळी कवळी गावातील ग्रामस्थांनी महाराजांच्या स्वागताची जोरदार तयारी केली होती महिलांनी डोक्यावर कलश घेत फुलांची उधळण करत.वारकऱ्यांनी पाउल खेळत. हरी नामाच्या गजरात कवळी वेशीतून समाज मंदिरापर्यंत महाराजांची रथात जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली यावेळी स्वामी शिवप्रेमानंदजी महाराज यांचा ग्रामस्थांच्या वतीने जल्लोषात व भक्तिमय वातावरणात सत्कार करण्यात आला. महाराजांच्या आगमनाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या सत्कार सोहळ्यास कवळी, हरेगाव, जवळगवाडी पुनर्वसन परिसरातील ग्रामस्थ तसेच विविध ग्रामपंचायतींचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी स्वामीजींचे आशीर्वाद घेतले.

यावेळी स्वामी शिवप्रेमानंदजी महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत आध्यात्मिक विचार, सेवा आणि समाजहिताचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. भक्तिमय वातावरणात झालेल्या या सत्कार सोहळ्याची परिसरात चर्चा होती. यावेळी सरपंच राहिबाई लहू जगताप उपसरपंच सुनीता महादेव जगताप सर्व ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन सर्व सदस्य . तंटामुक्ती अध्यक्ष सह कवळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# सोलापूर स्थानिक गुन्हे शाखा ग्रामीणची मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : कॉपर वायर चोरीचे एकूण ०६ गुणांची उकल सौर ऊर्जा प्लांट मधील व नदी काठावरील मोटारीचे केबल वायर जोडणारे जेरबंद फेकून १४५ किलोग्रॅम वजनाची कोपर वायर जप्त करून हे १,८८.,५०० किमतीच्या मुद्देमाल हस्तगत केला

मा पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण लातूर कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप यांना सोलापूर ग्रामीण जिल्ह्यामध्ये सौरऊर्जा सोलर प्लांट मधील, व इलेक्ट्रिक पंप पाणबुडी, मोटर मधील कॉपर वायर चोरीचे गुण्याची उकर करण्या आदेशित केले आहे.

सहाय्यक पोलीस ज्ञानदेव वाघ व त्यांची पथक मिळालेल्या बातमीप्रमाणे मौजे रानमसले तालुका उत्तर सोलापूर येथे जाऊन बातमीप्रमाणे आरोपीचा शोध घेतला असताना सदरचा इसम हा बातमी प्रमाणे त्यांची राहत्या घराजवळ उभा असलेल्या दिसला व साहेब पोलीस न्यानेश्वर वाघ यांना बातमी प्रमाणे संशय आल्याने त्यांच्या बातम्या घेऊन त्यांचे नाव पत्ता विचारत त्यांनी त्यांचे नाव १) समाधान नवनाथ पवार वय २१ वर्ष राहणार रानमसले तालुका उत्तर सोलापूर असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचे राहते घर तपासले असता त्याच्या घरामध्ये प्लास्टिकचे वेगवेगळे पोत्यामध्ये भरून ठेवलेले वायरचे पोते मिळून आली व तिच्या घरामध्ये मिळत असलेल्या मालाबाबत कौशल्यपूर्ण तपास करता त्यांनी मागील काही महिन्यापासून तो स्वतःच त्याच्या आणखीन एका साथीदार असं दोघांनी मिळून मौजे उंदरगाव वडशिंगे बेंबळे रांजणी तालुका माढा इत्यादी ठिकाणापासून वापरायची चोरी केली असून रात्रीच्या वेळी जाऊन सोलर सोलर प्लांट मधील उन्नतिकाच्या ठिकाणावरील कॉपर वायरची चोरी करून वेगवेगळे पोत्यामध्ये भरून जाळून त्याचा भरून ठेवलेली एकूण ०६ तांब्याचे तार व प्लॅस्टिकच्या पोत्यामध्ये मिळून आले व सदर आरोपींनी चोरी केलेले ठिकाण दाखवले असता त्याबाबत संबंधित पोलीस ठाण्याचे अभिलेख. पहिले असता त्याप्रमाणे त्यांच्यावर अनेक गुन्हे खालील प्रमाणे दाखल झाले आहे.

---

# स्वेरीमध्ये अभियंता दिनी 'रक्तदान शिबिर' संपन्न




**स्वेरीतील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभाग व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियंता दिना'चे औचित्य साधून मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी 'भव्य रक्तदान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली या ऐच्छिक रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन भारत सरकारच्या कोल्हापूर विभागातील आयकर विभागात (इन्कम टॅक्स) निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले राजानंद अर्जुन लोणकर तसेच वेळापूर मधील न्यु इंग्लिश स्कूलच्या सहशिक्षिका शितल काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन. एस. कागदे, विश्वस्त एच. एम. बागल, विश्वस्त बी. डी. रोंगे, सचिव डॉ. सूरज रोंगे, इतर सदस्य, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ऐच्छिक रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, अध्यापक वर्ग तसेच कर्मचारी यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' हा सामाजिक संदेश दिला. विशेष म्हणजे या उपक्रमात तब्बल १४८ ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान करून अमूल्य योगदान दिले. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे युवकांनी व समाजातील प्रत्येक घटकाने अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सदर रक्तदान शिबिर यशस्वी होण्यासाठी स्वेरीतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. स्वयंसेवकांनी रक्तदात्यांची नोंदणी, मार्गदर्शन, शिस्त व इतर आवश्यक व्यवस्थापनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदाते, प्राध्यापक, कर्मचारी आणि एन. एस. एस. स्वयंसेवकांचे मनःपूर्वक कौतुक केले. समाजहितासाठी रक्तदानासारख्या उपक्रमांची आवश्यकता असून, स्वेरी या संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांच्यासह एन.एस. एस.चे सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.

---

**कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ**

# विद्यार्थ्यांनी एकाग्रता व निर्णय क्षमता विकसित करण्यासाठी बुद्धिबळ खेळास प्राधान्य द्यावे : अविनाश पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रतिनिधी/अक्कलकोट : बुद्धिबळ खेळामधून विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, एकाग्रता, स्मरणशक्ती, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित होते. त्यामुळे खेळाडूमध्ये संयम, दूरदृष्टी, नियोजन आणि समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण होते. म्हणून विद्यार्थ्यांनी बुद्धिबळ खेळास प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात तालुका क्रीडा समितीने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, उद्योजक विलास कोरे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, बुद्धिबळ हा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जाणारा खेळ आहे, बुद्धिबळ खेळ 'विचार करून निर्णय घेणे, परिणामांचा अंदाज घेणे आणि अडचणींवर शांतपणे उपाय शोधणे' शिकवतो. म्हणूनच बुद्धिबळ हा केवळ एक खेळ नसून बौद्धिक विकास आणि व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी साधन आहे.

प्रारंभी शारीरिक शिक्षक क्रीडा महासंघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्याणशेट्टी प्रशालेतील क्रीडा शिक्षक कुमार जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबुराव पवार यांनी केले. सूत्रसंचलन नागराज कलबुर्गी यांनी केले तर आभार दत्तात्रय हिळळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी अविनाश राठोड, सोनल जाजू, सर्जेराव माशाळे, रवींद्र इंगळे, ज्योती नवले, दत्तात्रय धानोरे यांनी प्रयत्न केले.

> ### बुद्धिबळ स्पर्धेमध्ये ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग
> **अक्कलकोट तालुका क्रीडा समितीने आयोजित केलेल्या पावसाळी बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.**

> ### बुद्धिबळामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास
> **बुद्धिबळ हा जगातील सर्वात लोकप्रिय खेळ असून त्यामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, तर्कशक्ती, एकाग्रता विकसित होते. त्यांचा सर्वांगीण विकास होतो म्हणून तालुका क्रीडा समितीने बुद्धिबळास प्राधान्य दिले आहे असे मत समितीचे प्रमुख बाबुराव पवार यांनी व्यक्त केले.**

---

# वागदरी येथे एक दिवशी धम्म संस्कार शिबिराचे आयोजन :

## भदन्त धम्मसार थेरो शिबिराला मार्गदर्शन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के.गायकवाड : वर्षावास निमित्ताने वागदरी तालुका तुळजापूर येथे दि. २० सपेंबर २०२६ वार रविवार रोजी एक दिवशीय आनापान ध्यान व धम्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून तक्षशिला व संघमित्रा बुद्ध विहार किल्लारी तालुका औसा येथील पूज्य भदन्त धम्मसार थेरो यांचे या शिबिराला प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे..

दरवर्षी आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा हा तीन महिन्याचा काळ बौद्ध धम्मात वर्षावासाचा काळ म्हणून पाळला जातो वर्षा म्हणजे पाऊस वास म्हणजे निवास या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये धम्म प्रचारक आपापल्या गावी बुद्ध विहारात, समाज मंदिरात बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचे कार्य करतात त्या निमित्ताने बौद्ध बांधव आपापल्या गावी आपापल्या परीने कार्यक्रमाचे आयोजन करतात.

धम्माची साधना करुणा आणि आत्मविश्वासाचा पावन काळ म्हणजेच वर्षावास होय या निमित्ताने पंचशील बुद्ध विहार समिती,भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी, बी.आर.तरुण मंडळ व समस्त बौद्ध उपासक उपासिका वागदरी ता. तुळजापूर यांच्या वतीने रविवार दिनांक २० सप्टेंबर २२६ रोजी एक दिवशीय अनापान ध्यान व धम्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराला रविवार दि.२० सप्टेबर २२६ रोजी सकाळी ठिक ९. वाजता सुरुवात होणार असून हे शिबिर सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालणार आहे. बौद्ध धम्म हा तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मानवतावादी तत्त्वावर आधारलेला असून प्रत्येक तत्व सत्यता व सद्गुणांने भरभरून आहे. मनुष्याने अकुशल कर्म करू नये,सदैव कुशल व सतकर्म करत राहावे.नेहमी चित्ताला निर्मळ व परिशुद्ध करत राहावे हेच बुद्ध शासन होय. म्हणून तयागत भगवान बुद्धांचा प्रज्ञा! शील! करुणा! हा उपदेश समजून घेण्यासाठी वागदरी येथे एक दिवसीय आनापान ध्यान व धम्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी वागदरी व परिसरातील तमाम बौद्ध बांधवांनी युवक युवतीनी व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यानी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थितीत राहून सहकार्य करावे असे आवाहन पंचशील बुद्ध विहार समिती,भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी, बि.आर.तरुण मंडळ व समस्त बौद्ध बांधव वागदरी च्या वतीने करण्यात येत आहे.